तरुण भारत ५ ऑगस्ट २००३



कै. व्ही. टी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त 'कमला कॉलेज' मध्ये युवती सहकार मेळाव्यात बोलताना प्राचार्य क्रांतीकुमार पाटील व उपस्थित युवती. (छाया– राजा उपळेकर)

# रोजगार संधीने मुली सहकारात यशस्वी होतील

**कोल्हापूर/ प्रतिनिधी ■**

वेळेचे नियोजन, ध्येयनिष्ठ स्वप्ने हे व्यक्तीमत्व विकासातील महत्वाचे घटक आहेत. या आधारे आत्मविश्वासाच्या बळावर विविध रोजगार संधीचा लाभ घेऊन मुली सहकार क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात, असा विश्वास रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी डी. जी. कुंभर यांनी व्यक्त केला.

## डी. जी. कुंभार यांना विश्वास

ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष कै. डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या १०३ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, जिल्हा सहकारी बोर्ड व कमला कॉलेज यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या युवती सहकार मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य क्रांतीकुमार पाटील होते.

यावप्रसंगी जिल्हा मार्गदर्शन अधिकारी एच. आय. शिंदे यांनी स्पर्धा परीक्षाविषयी माहिती दिली. खादी ग्रामोद्योग मंडळाचे पर्यवेक्षक आर. के. देसाई यांनी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. यावेळी कृष्णकांत खामकर, एन. व्ही. पोवार, ए. आर. कळंत्रे यांची भाषणे झाली. यानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना, एन. सी. सी.च्यावतीने आयोजित करण्याततत आलेल्या रक्तदान शिबिरात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सी. पी. आर. रूग्णालय रक्तपेढीच्या सहकार्याने पार पडलेल्या रक्तदान शिबिरात ६० विद्यार्थिनींनी रक्तदान केले. प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन झाले.

दरम्यान, सकाळी कै. व्ही. टी. पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. सौ. तेजस्विनी मुडेकर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थिनी उपस्थित होत्या. प्रा. अनघा पाठक यांनी आभार मानले.

पुढारी ५ ऑगस्ट २००३



युवती सहकार मेळाव्यात बोलताना प्राचार्य क्रांतीकुमार पाटील छायाचित्रात डावीकडून ए. आर. कळंत्रे, डी. जी. कुंभार, राज कदम, आर. के. देसाई, कृष्णाकांत खामकर आदी. (छाया : तय्यब अली)

# विद्यार्थ्यीनींचे भवितव्य घडविण्यास सहकार मेळावे मार्गदर्शक : प्रा. पाटील

**कोल्हापूर :** सहकार मेळावे हे विद्यार्थिनींचे भवितव्य घडवण्यास मार्गदर्शक ठरतील, असे प्रतिपादन प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांनी केले. कै. डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या १०३ वी जयंती व युवती सहकार मेळाव्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कै. डॉ. व्ही. टी. पाटील यांचे सहकार चळवळीतील योगदान मोलाचे होते. त्याचा आदर्श घेत आजच्या युवतींनी सहकाराच्या माध्यमातून आपले भवितव्य घडवावे, असे सांगितले. शासनाकडे विविध व्यावसायिक योजना आहेत. त्यांचे ज्ञान विद्यार्थिनींनी घ्यावे, असे आवाहन एच. आय. शिंदे यांनी केले. राज कदम म्हणाले एक उत्तम व्यक्तिमत्त्व प्रामाणिक व कष्टाच्या जोरावर घडते यावेळी कृष्णकांत खामकर यांनी विचार मांडले. यावेळी कै. डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना व राष्टीय छात्र